राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२
नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी
प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम - २०२५

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

ई-मेलद्वारे

क्र.रानिआ-२०२५/निका/नप/प्र.क्र.१४/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०४/११/२०२५

प्रति,

जिल्हाधिकारी,सर्व

विषय :- राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम-२०२५.

संदर्भ :-१) नगरविकास विभागाचे एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४, दि.१०/०६/२०२५, दि.१२/०६/२०२५ व दि.१४/०८/२०२५ अन्वये प्रभाग रचना कार्यक्रम

२) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.११/का-६, दि.०३/१०/२०२५ आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम

३) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.१०/का-६ दि.३०/०९/२०२५ चे मतदार यादी कार्यक्रम व सुधारीत दि.१३/१०/२०२५.

४) नगरविकास विभाग क्र.एमसीओ-२०२५/प्र.क्र.४०९/नवि-१४, दि.०६/१०/२०२५ रोजीचे नगराध्यक्ष आरक्षणाबाबतचे पत्र.

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये दिनांक ०६/०५/२०२५ व दि.१६/०९/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार व अधीन राहून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करणे बंधनकारक आहे.

त्यानुसार २४६ नगर परिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता आयोगाने दि.०३/१०/२०२५ रोजी दिलेल्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमानुसार आरक्षण अंतिम करण्यात आले आहे. तसेच नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम दि.३०/०९/२०२५ रोजी सुधारित मतदार यादी कार्यक्रम दि.१३/१०/२०२५ रोजी देण्यात आला होता. त्यानुसार अंतिम प्रभाग निहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन दि.३१/१०/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या असून मतदान केंद्रनिहाय यादी दि.०७/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ५१अ-१अ नुसार नगरपरिषदा व ३४१ब-१अ नुसार नगपंचायतींच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुका थेट निवड पध्दतीने करण्याबाबतची तरतुद केली आहे. तसेच याच अधिनियमातील कलम ५२ नुसार नगरपरिषदा व ३४१ब-४ नुसार नगरपंचायतींच्या यापुढील निवडणुकांकरिता नगराध्यक्ष पदाची मुदत पाच वर्ष इतकी केली आहे. त्याअनुषंगाने नगरविकास विभागाने संदर्भाधीन क्र.४ च्या पत्राच्या अन्वये दि.०६/१०/२०२५ रोजी अध्यक्ष आरक्षण सोडत पध्दतीने निश्चित केले आहे.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाचे पालन करण्याकरिता राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १०अ पोटकलम (४) मधील अधिकारांचा वापर करुन, राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम राबविण्यात यावा असे याद्वारे जाहीर करण्यात येत आहे. सदरच्या सार्वत्रिक निवडणुका मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.०६/०५/२०२५ रोजीच्या आदेशान्वये विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

-:आदेश:-

१. सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-१** मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार **परिशिष्ट-२** मध्ये दर्शविलेल्या राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.

२. राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९अ व ३४१ब नुसार सदस्यांसाठी तसेच ५१-१ब व ३४१ब अन्वये अध्यक्षांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्रासोबत जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची पोहोचपावती नामनिर्देशन पत्रासोबत सादर

करण्याची त्यांना मुभा देण्यात आली आहे. नामनिर्देशनपत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या शासनाच्या दि.३ नोव्हेंबर, २०२५ च्या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आली असून जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता निवडून आल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आता सादर करण्याबाबतची तरतुद केली आहे. या तरतुदीनुसार कार्यवाही करावी. उमेदवार निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून अधिनियमातील तरतुदीनुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल असे विहित केलेले हमीपत्र उमेदवाराकडून घेण्यात यावे.

३. त्याअनुषंगाने या पत्रान्वये नगरपरिषदा/ नगरपंचायतींमधील सदस्य व अध्यक्ष पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम **परिशिष्ट-१** प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. तसेच अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वत्रिक निवडणुका घ्यावयाच्या नगरपरिषदा/ नगरपंचायतींची यादी सोबत **परिशिष्ट-२** मध्ये जोडण्यात येत आहे.

४. परिशिष्ट-१ येथील निवडणूक कार्यक्रमानुसार मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल.

५. **या निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र स्विकारण्याची प्रक्रिया संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येत आहे.** राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र सहजरितीने भरता यावे यासाठी महाआयटीच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारेच नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. त्यांनी https://mahasecelec.in/ या वेबसाईटवर जाऊन त्यामध्ये स्वत:ची नोंदणी (Register) करुन घ्यावी व नामनिर्देशनपत्रामध्ये तसेच शपथपत्रामध्ये माहिती भरावी. त्याची प्रिंट घेवून त्यावर स्वाक्षरी करुन ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे. अशा प्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशन पत्राचा अर्ज नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

६. निवडणुकीची आचारसंहिता निवडणूक कार्यक्रम निर्गमित केलेल्या वेळेपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता सार्वत्रिक निवडणुकांकरिता नगर परिषदा/ नगरपंचायतींच्या संपूर्ण क्षेत्रात लागू राहील. उपरोक्त क्षेत्रातील मतदारांवर प्रलोभन देणारी कोणतीही कृती/ घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही.

७. सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या प्रभाग रचना, आरक्षण व सोडत तसेच मतदार यादीसंदर्भात न्यायालयात याचिका दाखल झाल्या असल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच कोणत्याही रिट याचिकेमध्ये मा.

न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम तात्काळ रद्द/ स्थगित करुन तसे आयोगास अवगत करावे.

८. नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

९. सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे:-

| | |
|---|---|
| संकेत स्थळ | : https://mahasecelec.in/ |
| दूरध्वनी क्रमांक (नगरपालिका शाखा) | : २२८४६७२१ |
| दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) | : २२८८६९५० |
| ई-मेल | : sec.council@mah.gov.in / sec.compu@mah.gov.in |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

०४.११.२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र- परिशिष्ट-१ व २

प्रत :- १) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८) विभागीय आयुक्त, सर्व
९) संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक
१०) संबंधित नगर परिषदा व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी/प्रशासक
११) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई- ४०० ००४.
१२) राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.

## परिशिष्ट - १ (सार्वत्रिक निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.१४/का.६, दि. ०४/११/२०२५ सोबतचे सहपत्र)

राज्यातील जिल्ह्यांमधील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्य व अध्यक्ष पदांसाठी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-२०२५.

| अ.क्र | निवडणूकीचा टप्पा | तपशिल |
|---|---|---|
| १ | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्यात आल्याचा दिनांक | ३१/१०/२०२५ (शुक्रवार) |
| २ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | ०६/११/२०२५ |
| ३ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी. | १०/११/२०२५ ते १७/११/२०२५ (दि.१७/११/२०२५ रोजी दुपारी ०२.०० पर्यंत) |
| ४ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | १०/११/२०२५ ते १७/११/२०२५ (दि.१७/११/२०२५ रोजी दुपारी ०३.०० पर्यंत) रविवार या सुट्टींच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. |
| ५ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १८/११/२०२५ सकाळी ११.०० वाजेपासुन |
| ६-अ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपील नसेल तेथे | १९/११/२०२५ ते २१/११/२०२५ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत |
| ६-ब | अपील असल्यास<br>वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल. निवडणूक निर्णय अधिकारी यानी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत. | २१/११/२०२५ ते २५/११/२०२५ अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी. मात्र दिनांक २५/११/२०२५ पर्यंत. |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २६/११/२०२५ |
| ८ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | ०२/१२/२०२५ सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ९ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | ०३/१२/२०२५ सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| १० | शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | दि.१०/१२/२०२५ पुर्वी कलम १९ मधील तरतुदीनुसार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

| क्र. रानिआ२०२५/निका/नप-२०२५ /प्र.क्र.१४/ का-६ | | | | |
|---|---|---|---|---|
| परिशिष्ट - २ | | | | |
| चअ.क्र | जिल्हा | नगरपरिषद / नगरपंचायतीचे नाव | नप/नपं | वर्ग |
| १ | पालघर | डहाणू | नप | ब |
| २ | पालघर | जव्हार | नप | क |
| ३ | पालघर | पालघर | नप | ब |
| ४ | पालघर | वाडा | नपं | |
| ५ | रायगड | अलिबाग | नप | क |
| ६ | रायगड | कर्जत | नप | क |
| ७ | रायगड | खोपोली | नप | ब |
| ८ | रायगड | महाड | नप | क |
| ९ | रायगड | माथेरान | नप | क |
| १० | रायगड | मुरूड-जंजिरा | नप | क |
| ११ | रायगड | पेण | नप | क |
| १२ | रायगड | रोहा | नप | क |
| १३ | रायगड | श्रीवर्धन | नप | क |
| १४ | रायगड | उरण | नप | क |
| १५ | रत्नागिरी | चिपळूण | नप | ब |
| १६ | रत्नागिरी | देवरुख | नपं | |
| १७ | रत्नागिरी | गुहागर | नपं | |
| १८ | रत्नागिरी | खेड | नप | क |
| १९ | रत्नागिरी | लांजा | नपं | |
| २० | रत्नागिरी | राजापूर | नप | क |
| २१ | रत्नागिरी | रत्नागिरी | नप | ब |
| २२ | सिंधुदूर्ग | कणकवली | नपं | |
| २३ | सिंधुदूर्ग | मालवण | नप | क |
| २४ | सिंधुदूर्ग | सावंतवाडी | नप | क |
| २५ | सिंधुदूर्ग | वेंगुर्ला | नप | क |
| २६ | ठाणे | अंबरनाथ | नप | अ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७ | ठाणे | कुळगाव-बदलापूर | नप | अ |
| २८ | अहिल्यानगर | देवळाली-प्रवरा | नप | क |
| २९ | अहिल्यानगर | जामखेड | नप | क |
| ३० | अहिल्यानगर | कोपरगाव | नप | ब |
| ३१ | अहिल्यानगर | नेवासा | नपं | |
| ३२ | अहिल्यानगर | पाथर्डी | नप | क |
| ३३ | अहिल्यानगर | राहाता | नप | क |
| ३४ | अहिल्यानगर | राहूरी | नप | क |
| ३५ | अहिल्यानगर | संगमनेर | नप | ब |
| ३६ | अहिल्यानगर | शेवगाव | नप | क |
| ३७ | अहिल्यानगर | शिर्डी | नप | क |
| ३८ | अहिल्यानगर | श्रीगोंदा | नप | क |
| ३९ | अहिल्यानगर | श्रीरामपूर | नप | ब |
| ४० | धुळे | दोंडाईचा-वरवाडे | नप | ब |
| ४१ | धुळे | पिंपळनेर | नप | क |
| ४२ | धुळे | सिंदखेडा | नपं | |
| ४३ | धुळे | शिरपूर-वरवाडे | नप | ब |
| ४४ | जळगाव | जामनेर | नप | ब |
| ४५ | जळगाव | अमळनेर | नप | ब |
| ४६ | जळगाव | भडगाव | नप | क |
| ४७ | जळगाव | भूसावळ | नप | अ |
| ४८ | जळगाव | चाळीसगाव | नप | ब |
| ४९ | जळगाव | चोपडा | नप | ब |
| ५० | जळगाव | धरणगांव | नप | क |
| ५१ | जळगाव | एरंणडोल | नप | क |
| ५२ | जळगाव | फैजपूर | नप | क |
| ५३ | जळगाव | मुक्ताईनगर | नपं | |
| ५४ | जळगाव | नशिराबाद | नप | क |
| ५५ | जळगाव | पाचोरा | नप | ब |
| ५६ | जळगाव | परोळा | नप | क |
| ५७ | जळगाव | रावेर | नप | क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५८ | जळगाव | सावदा | नप | क |
| ५९ | जळगाव | शेंदूर्णी | नपं | |
| ६० | जळगाव | वरणगांव | नप | क |
| ६१ | जळगाव | यावल | नप | क |
| ६२ | नंदूरबार | शहादा | नप | ब |
| ६३ | नंदूरबार | नंदूरबार | नप | अ |
| ६४ | नंदूरबार | नवापूर | नप | क |
| ६५ | नंदूरबार | तळोडा | नप | क |
| ६६ | नाशिक | भगुर | नप | क |
| ६७ | नाशिक | मनमाड | नप | ब |
| ६८ | नाशिक | नांदगाव | नप | क |
| ६९ | नाशिक | सटाणा | नप | क |
| ७० | नाशिक | सिन्नर | नप | ब |
| ७१ | नाशिक | येवला | नप | ब |
| ७२ | नाशिक | चांदवाड | नप | क |
| ७३ | नाशिक | इगतपूरी | नप | क |
| ७४ | नाशिक | ओझर | नप | ब |
| ७५ | नाशिक | पिंपळगांव बसमत | नप | क |
| ७६ | नाशिक | त्र्यंबक | नप | क |
| ७७ | कोल्हापूर | आजरा | नपं | |
| ७८ | कोल्हापूर | चंदगड | नपं | |
| ७९ | कोल्हापूर | गडहिंग्लज | नप | क |
| ८० | कोल्हापूर | हातकणंगले | नपं | |
| ८१ | कोल्हापूर | हुपरी | नप | क |
| ८२ | कोल्हापूर | जयसिंगपूर | नप | ब |
| ८३ | कोल्हापूर | कागल | नप | क |
| ८४ | कोल्हापूर | कुरुंदवाड | नप | क |
| ८५ | कोल्हापूर | मलकापूर | नप | क |
| ८६ | कोल्हापूर | मुरगूड | नप | क |
| ८७ | कोल्हापूर | पन्हाळा | नप | क |
| ८८ | कोल्हापूर | शिरोळ | नप | क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८९ | कोल्हापूर | वडगाव (कोल्हापूर) | नप | क |
| ९० | पुणे | आळंदी | नप | क |
| ९१ | पुणे | बारामती | नप | अ |
| ९२ | पुणे | भोर | नप | क |
| ९३ | पुणे | चाकण | नप | ब |
| ९४ | पुणे | दौंड | नप | ब |
| ९५ | पुणे | फुरसुंगी-उरळी देवाची | नप | क |
| ९६ | पुणे | इंदापूर | नप | क |
| ९७ | पुणे | जेजूरी | नप | क |
| ९८ | पुणे | जुन्नर | नप | क |
| ९९ | पुणे | लोणावळा | नप | क |
| १०० | पुणे | मालेगाव बु. | नपं | |
| १०१ | पुणे | मंचर | नपं | |
| १०२ | पुणे | राजगुरुनगर | नप | क |
| १०३ | पुणे | सासवड | नप | क |
| १०४ | पुणे | शिरुर | नप | क |
| १०५ | पुणे | तळेगाव-दाभाडे | नप | ब |
| १०६ | पुणे | वडगाव (पुणे) | नपं | |
| १०७ | सांगली | आष्टा | नप | क |
| १०८ | सांगली | आटपाडी | नपं | |
| १०९ | सांगली | इस्लामपूर | नप | ब |
| ११० | सांगली | जत | नप | क |
| १११ | सांगली | पळूस | नप | क |
| ११२ | सांगली | शिराळा | नपं | |
| ११३ | सांगली | तासगाव | नप | क |
| ११४ | सांगली | विटा | नप | ब |
| ११५ | सातारा | कराड | नप | ब |
| ११६ | सातारा | महाबळेश्वर | नप | क |
| ११७ | सातारा | मलकापूर(सातारा) | नप | क |
| ११८ | सातारा | मेढा | नपं | |
| ११९ | सातारा | म्हसवड | नप | क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२० | सातारा | पाचगणी | नप | क |
| १२१ | सातारा | फलटण | नप | ब |
| १२२ | सातारा | रहिमतपूर | नप | क |
| १२३ | सातारा | सातारा | नप | अ |
| १२४ | सातारा | वाई | नप | क |
| १२५ | सोलापूर | अक्कलकोट | नप | ब |
| १२६ | सोलापूर | अकलूज | नप | ब |
| १२७ | सोलापूर | अनागर | नपं | |
| १२८ | सोलापूर | बार्शी | नप | अ |
| १२९ | सोलापूर | दुधनी | नप | क |
| १३० | सोलापूर | करमाळा | नप | क |
| १३१ | सोलापूर | कुर्डूवाडी | नप | क |
| १३२ | सोलापूर | मैंदर्गी | नप | क |
| १३३ | सोलापूर | मंगळवेढा | नप | क |
| १३४ | सोलापूर | मोहोळ | नप | क |
| १३५ | सोलापूर | पंढरपूर | नप | ब |
| १३६ | सोलापूर | सांगोला | नप | क |
| १३७ | बीड | अंबेजोगाई | नप | ब |
| १३८ | बीड | बीड | नप | अ |
| १३९ | बीड | धारुर | नप | क |
| १४० | बीड | गेवराई | नप | क |
| १४१ | बीड | माजलगाव | नप | ब |
| १४२ | बीड | परळी-वैजनाथ | नप | ब |
| १४३ | छ. संभाजीनगर | फुलंब्री | नपं | |
| १४४ | छ. संभाजीनगर | गंगापूर | नप | क |
| १४५ | छ. संभाजीनगर | कन्नड | नप | ब |
| १४६ | छ. संभाजीनगर | खुलताबाद | नप | क |
| १४७ | छ. संभाजीनगर | पैठण | नप | ब |
| १४८ | छ. संभाजीनगर | सिल्लोड | नप | ब |
| १४९ | छ. संभाजीनगर | वेजापूर | नप | ब |
| १५० | धाराशिव | भूम | नप | क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५१ | धाराशिव | कळंब | नप | क |
| १५२ | धाराशिव | मुरुम | नप | क |
| १५३ | धाराशिव | नळदुर्ग | नप | क |
| १५४ | धाराशिव | धाराशिव | नप | अ |
| १५५ | धाराशिव | परंडा | नप | क |
| १५६ | धाराशिव | तुळजापूर | नप | क |
| १५७ | धाराशिव | उमरगा | नप | क |
| १५८ | हिंगोली | बसमतनगर | नप | ब |
| १५९ | हिंगोली | हिंगोली | नप | ब |
| १६० | हिंगोली | कळमनुरी | नप | क |
| १६१ | जालना | अंबड | नप | क |
| १६२ | जालना | भोकरदन | नप | क |
| १६३ | जालना | परतूर | नप | क |
| १६४ | लातूर | अहमदपूर | नप | ब |
| १६५ | लातूर | औसा | नप | क |
| १६६ | लातूर | निलंगा | नप | क |
| १६७ | लातूर | रेनापूर | नपं | |
| १६८ | लातूर | उदगीर | नप | अ |
| १६९ | नांदेड | बिलोली | नप | क |
| १७० | नांदेड | देगलूर | नप | ब |
| १७१ | नांदेड | धर्माबाद | नप | क |
| १७२ | नांदेड | हदगाव | नप | क |
| १७३ | नांदेड | हिमायतनगर | नपं | क |
| १७४ | नांदेड | कंधार | नप | क |
| १७५ | नांदेड | कुंडलवाडी | नप | क |
| १७६ | नांदेड | मुदखेड | नप | क |
| १७७ | नांदेड | मुखेड | नप | क |
| १७८ | नांदेड | उमरी | नप | क |
| १७९ | नांदेड | भोकर | नप | क |
| १८० | नांदेड | किनवट | नप | क |
| १८१ | नांदेड | लोहा | नप | क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८२ | परभणी | गंगाखेड | नप | ब |
| १८३ | परभणी | जिंतूर | नप | ब |
| १८४ | परभणी | मानवत | नप | क |
| १८५ | परभणी | पाथरी | नप | क |
| १८६ | परभणी | पूर्णा | नप | क |
| १८७ | परभणी | सेलू | नप | ब |
| १८८ | परभणी | सोनपेठ | नप | क |
| १८९ | अकोला | अकोट | नप | ब |
| १९० | अकोला | बाळापूर | नप | ब |
| १९१ | अकोला | बार्शी-टाकळी | नपं | |
| १९२ | अकोला | हिवरखेडा | नप | क |
| १९३ | अकोला | मुर्तीजापूर | नप | ब |
| १९४ | अकोला | तेल्हारा | नप | क |
| १९५ | अमरावती | अचलपूर | नप | अ |
| १९६ | अमरावती | अंजनगाव सुर्जी | नप | ब |
| १९७ | अमरावती | चांदूरबाजार | नप | क |
| १९८ | अमरावती | चांदूर रेल्वे | नप | क |
| १९९ | अमरावती | चिखलदरा | नप | क |
| २०० | अमरावती | दर्यापूर | नप | ब |
| २०१ | अमरावती | धामणगाव रेल्वे | नप | क |
| २०२ | अमरावती | धरणी | नपं | |
| २०३ | अमरावती | मोर्शी | नप | क |
| २०४ | अमरावती | नंद-खांदेश्वर | नपं | |
| २०५ | अमरावती | शेंदूरजनाघाट | नप | क |
| २०६ | अमरावती | वरुड | नप | ब |
| २०७ | बुलढाणा | बुलढाणा | नप | ब |
| २०८ | बुलढाणा | चिखली | नप | ब |
| २०९ | बुलढाणा | देऊळगाव राजा | नप | क |
| २१० | बुलढाणा | जळगाव जामोद | नप | क |
| २११ | बुलढाणा | खामगाव | नप | ब |
| २१२ | बुलढाणा | लोणार | नप | क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१३ | बुलढाणा | मलकापूर (बुलढाणा) | नप | ब |
| २१४ | बुलढाणा | मेहकर | नप | ब |
| २१५ | बुलढाणा | नांदूरा | नप | ब |
| २१६ | बुलढाणा | शेगाव | नप | ब |
| २१७ | बुलढाणा | सिंदखेडराजा | नप | क |
| २१८ | वाशिम | कारंजा | नप | ब |
| २१९ | वाशिम | मालेगाव . | नपं | |
| २२० | वाशिम | मंगरुळपीर | नप | क |
| २२१ | वाशिम | रिसोड | नप | क |
| २२२ | वाशिम | वाशिम | नप | ब |
| २२३ | यवतमाळ | आर्णी | नप | क |
| २२४ | यवतमाळ | दारव्हा | नप | क |
| २२५ | यवतमाळ | दिग्रस | नप | ब |
| २२६ | यवतमाळ | घाटंजी | नप | क |
| २२७ | यवतमाळ | पुसद | नप | ब |
| २२८ | यवतमाळ | उमरखेड | नप | ब |
| २२९ | यवतमाळ | वणी | नप | ब |
| २३० | यवतमाळ | यवतमाळ | नप | अ |
| २३१ | यवतमाळ | ढाणकी | नपं | |
| २३२ | यवतमाळ | नेर-नबाबपूर | नप | क |
| २३३ | यवतमाळ | पांढरकवडा | नप | क |
| २३४ | भंडारा | पवनी | नप | क |
| २३५ | भंडारा | साकोली शेंदूरवाफा | नप | क |
| २३६ | भंडारा | तुमसर | नप | ब |
| २३७ | भंडारा | भंडारा | नप | ब |
| २३८ | चंद्रपूर | बल्लारपूर | नप | ब |
| २३९ | चंद्रपूर | भद्रावती | नप | ब |
| २४० | चंद्रपूर | भिसी | नपं | |
| २४१ | चंद्रपूर | ब्रह्मपूरी | नप | क |
| २४२ | चंद्रपूर | चिमूर | नप | क |
| २४३ | चंद्रपूर | गडचांदूर | नप | क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४४ | चंद्रपूर | घुग्घुस | नप | क |
| २४५ | चंद्रपूर | मूल | नप | क |
| २४६ | चंद्रपूर | नागभीड | नप | क |
| २४७ | चंद्रपूर | राजुरा | नप | क |
| २४८ | चंद्रपूर | वरोरा | नप | ब |
| २४९ | गडचिरोली | आरमोरी | नप | क |
| २५० | गडचिरोली | देसाईगंज | नप | क |
| २५१ | गडचिरोली | गडचिरोली | नप | ब |
| २५२ | गोंदीया | गोंदिया | नप | अ |
| २५३ | गोंदीया | गोरेगाव | नपं | |
| २५४ | गोंदीया | सालेकसा | नपं | |
| २५५ | गोंदीया | तीरोडा | नप | क |
| २५६ | नागपूर | बहादूरा | नपं | |
| २५७ | नागपूर | बेसा पिपळा | नपं | |
| २५८ | नागपूर | भिवापूर | नपं | |
| २५९ | नागपूर | बुटीबोरी | नप | क |
| २६० | नागपूर | डिगडोह | नप | क |
| २६१ | नागपूर | कळमेश्वर-ब्रह्मणी | नप | क |
| २६२ | नागपूर | कामठी | नप | ब |
| २६३ | नागपूर | कांद्री-कन्हान | नपं | |
| २६४ | नागपूर | काटोल | नप | ब |
| २६५ | नागपूर | खापा | नप | क |
| २६६ | नागपूर | कोंढाळी | नपं | |
| २६७ | नागपूर | महादुळा | नपं | |
| २६८ | नागपूर | मोहपा | नप | क |
| २६९ | नागपूर | मौदा | नपं | |
| २७० | नागपूर | नरखेड | नप | क |
| २७१ | नागपूर | निलडोह | नपं | |
| २७२ | नागपूर | पारशिवणी | नपं | |
| २७३ | नागपूर | रामटेक | नप | क |
| २७४ | नागपूर | सावनेर | नप | क |

१२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७५ | नागपूर | उमरेड | नप | ब |
| २७६ | नागपूर | वानाडोंगरी | नप | क |
| २७७ | नागपूर | बिडगाव-तरोडी (खु) पांढुर्णा | नपं | |
| २७८ | नागपूर | गोधणी(रेल्वे) | नपं | |
| २७९ | नागपूर | कन्हान-पिपरी | नप | क |
| २८० | नागपूर | मोवाड | नप | क |
| २८१ | नागपूर | वाडी | नप | ब |
| २८२ | नागपूर | येरखेडा | नपं | |
| २८३ | वर्धा | आर्वी | नप | ब |
| २८४ | वर्धा | देवळी | नप | क |
| २८५ | वर्धा | हिंगणघाट | नप | अ |
| २८६ | वर्धा | पुलगाव | नप | क |
| २८७ | वर्धा | सिंदी रेल्वे | नप | क |
| २८८ | वर्धा | वर्धा | नप | अ |